**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.०९/२०२६ मधील निशाणी १ वरील आदेश</u>**

१. अर्जदार यांनी हा अर्ज गु.र.नं.०८/२०२६ चे कामी जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी जप्त केलेली क्रॉव्हलर सह कॉम्प्रेसर मशीन *(यापुढे त्याचा उल्लेख "जप्त मशीन" असा केला आहे.)* परत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे अर्जातील कथनांप्रमाणे जप्त मशीन हे त्यांचे मालकीचे असून जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी गुन्हा रजि.नं.०८/२०२६ चे कामी ते मशीन जप्त केले आहे. ते मशीन जाबदार यांचे कार्यालयाचे आवारात बंद अवस्थेत पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदार हे अटी व शर्तींचे पालन करणेस तयार आहेत. सबब, अर्ज मंजूर करणेत यावा, अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. जाबदार यांनी निशाणी ६ वर म्हणणे दाखल करुन जप्त मशीनबाबत योग्य तो आदेश करणेत यावा, असे कथन केले आहे.

४. सहाय्यक सरकारी वकील यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांचे कथनांप्रमाणे अर्जातील मुद्देमाल हा गु.र.नं.०८/२०२६ मधील महत्त्वाचा व वस्तुनिष्ठ पुरावा आहे. गुन्हयाचा तपास प्राथमिक स्तरावर असल्याने तपासकामी मुद्देमालाची आवश्यकता आहे. तसेच, अर्जदार मागत असलेल्या मुद्देमालाचे मालकी व ताब्याबाबत दर्शविणारे दस्त अभिलेखावर दिसून येत नाहीत. अर्जदार यांना कंपनीतर्फे अर्ज करण्याकरिता अधिकारपत्र दिलेले आहेत किंवा नाही, त्याबाबतचा कोणताही दस्त/अधिकारपत्र दिसून येत नाही. जप्त मुद्देमालाचे मालकी व ताब्याबाबत शहानिशा होणे गरजेचे आहे. जप्त मुद्देमाल अर्जदाराचे ताब्यात दिल्यास अर्जदार त्यात फेरबदल, विक्री करण्याची शक्यता

असून परस्पर विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, जप्त मशीन हे अर्जदार यांचे ताब्यात देण्यात येवू नये, अशी विनंती सहाय्यक सरकारी वकील यांनी केली आहे.

**५.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये आणि जाबदार व सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये केलेली कथने आणि निशाणी १४ वरील प्रथम खबरी अहवाल पाहता अर्जदार यांचे वर नमूद मशीन हे अकोले पोलीस स्टेशन गु.र.नं.०८/२०२६ चे कामी जप्त केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. निशाणी १५ वरील सर्टिफिकेट ऑफ इनकॉर्पोरेशन ची ऑनलाईन प्रत पाहता अर्जदार कंपनी ही नोंद असल्याचे दिसून येते. निशाणी ९ वरील टॅक्स इनोव्हाईस पाहता जप्त मशीन हे अर्जदार कंपनीचे मालकीचे असल्याचे दिसून येते. निशाणी १६ वरील कर्जखाते उतारा पाहता अर्जदार कंपनीने जप्त मशीन खरेदी करणेकरिता आय.सी.आय.सी.आय. बँक, शाखा सिन्नर यांचेकडून कर्ज घेतल्याचे दिसून येते. निशाणी १० वरील प्रतिज्ञापत्र पाहता अर्जदार कंपनीचे संचालक अनिल चंद्रभान वाकचौरे यांनी जप्त मशीन हे अर्जदार कंपनीचे अन्य संचालक शुभम संजय दराडे यांच्या ताब्यात देण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे, असे दिसून येते. निशाणी १७ वरील आधार कार्डची प्रमाणित प्रत पाहता अर्जदार कंपनीतर्फे संचालक शुभम संजय दराडे यांची ओळख स्पष्ट होते.

**६.** सहाय्यक सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये अर्जदार हे जप्त मशीन विक्री अगर त्यामध्ये बदल करण्याची शक्यता आहे, अशा हरकती घेतल्या आहेत. परंतु, त्यांनी उपस्थित केलेल्या हरकतींचे स्वरुप पाहता त्या हरकती तांत्रिक स्वरुपाच्या असल्याचे दिसून येते. त्या हरकतींचा विचार करता त्या अनुषंगाने काही अटी व शर्तीवर अर्जदार यांना जप्त मशीनचा अंतरिम ताबा देता येऊ शकतो. जप्त मशीन हे जाबदार यांचे कार्यालयाचे आवारात विनावापर ठेवून दिल्यास ते मशीन

खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झालेस, अर्जदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. अर्जदार हे मालक या नात्याने जप्त मशीनची व्यवस्थित देखभाल करु शकतात. सबब, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ५०३ मधील तरतूदींचा विचार करता व **सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द स्टेट ऑफ गुजरात, ए.आय.आर.२००३, सुप्रिम कोर्ट ६३८** या न्यायनिर्णयाचा विचार करता वर नमूद मशीन अर्जदार यांना काही अटी व शर्तींवर परत करणे योग्य व संयुक्तिक होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे :–

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्जदार यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** जाबदार अकोले पोलीस स्टेशन, अकोले यांनी अर्जदार यांना गु.र.नं.०८/२०२६ मधील जप्त मुद्देमाल क्रॉव्हलर सह कॉम्प्रेसर मशीन, सिरीयल नं.XAS 550–200 8975040257, PNE नं.PE2260236, M/C SR नं.F215–04202216–001 व Invoice नं.FM/22–23/033A खालील अटी व शर्तीवर परत करावे –

**अ.** अर्जदार यांनी एकूण रक्कम रुपये ३०,३०,०००/– (रुपये तीस लाख तीस हजार मात्र) चे बंधपत्र लिहून द्यावे.

**ब**. जप्त मशीन विक्री अगर तबदिल करणार नाही, त्यामध्ये फेरबदल करणार नाही आणि न्यायालयास व पोलिसांना आवश्यकता असेल त्यावेळी ते मशीन हजर करीन, अशा आशयाचे अर्जदार यांनी हमीपत्र लिहून द्यावे.

**क.** अर्जदार यांनी जप्त मशीन न्यायालयास व पोलिसांना आवश्यक वाटल्यास हजर करावे.

**ड.** अर्जदार यांनी जप्त मशीनचे चारही बाजूंनी प्रत्येकी चार प्रतींमध्ये रंगीत फोटो काढून ते जाबदार अकोले पोलीस स्टेशन यांचेकडे सादर करावेत.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.17 17:38:04 +0530

**दिनांक : १७.०३.२०२६**
**ठिकाण : अकोले**

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर.**

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original order.

Sd/-
(Amol U. Salpe)
Stenographer (Grade-3)
Jt.Civil Court Junior Division
Akole

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 17.03.2026 |
| Transcribed on | : | 17.03.2026 |
| Checked and signed on | : | 17.03.2026 |